# ७. माझी मराठी




• **ऐका. वाचा. म्हणा.**

माझी भाषा माझी आई
अर्थ भावनांना देई,
तिच्या राहावे ऋणात
होऊ नये उतराई.

तिच्या एकेका शब्दाला
रत्न-कांचनाचे मोल,
कधी तप्त लोहापरी
कधी चांदणे शीतल.


रानवाऱ्याच्या गंधात
माझी मराठी भिजली,
लेऊनिया नाना बोली
माझी मराठी सजली.

माझ्या भाषेचे अमृत
प्राशेल तो भाग्यवंत,
तिचा नाही दुजाभाव
असो कोणताही पंथ.

माझ्या मराठी भाषेची
काय वर्णावी थोरवी,
दूर देशी ऐकू येते
माझ्या मराठीची ओवी.

**मृणालिनी कानिटकर-जोशी** (१९६९) : आकाशवाणी व दूरदर्शनवरील विविध कार्यक्रमांचे लेखन. 'सीमंतिनी' हा कवितासंग्रह प्रसिद्ध.

मातृभाषेविषयी आपल्या मनात आपुलकी असते. आपल्या आईविषयी सर्वांना प्रेम असते, तसे प्रेम मराठी भाषेविषयी सर्वांना वाटते. आपल्या मराठी भाषेतील शब्दांचे महत्त्व, बोलींचे महत्त्व, मराठी भाषेची थोरवी प्रस्तुत कवितेतून सांगितली आहे.




## स्वाध्याय

**प्र. १. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) कवयित्रीचे मराठी भाषेशी नाते–

(आ) खरा भाग्यवंत–

(इ) (ई)




**प्र. २. खाली दिलेल्या अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) विविध बोलींमुळे मराठी भाषा समृद्ध झाली आहे.

(आ) माझ्या मराठीची ओवी दूर देशांतही ऐकायला मिळते.

**प्र. ३. खालील कवितेच्या ओळींतील भाव तुमच्या शब्दांत लिहा.**

माझी भाषा माझी आई अर्थ भावनांना देई,
तिच्या राहावे ऋणात होऊ नये उतराई.

**प्र. ४. खालील शब्दांचा उपयोग करून तुमच्या मनाने वाक्ये तयार करा.**

(१) ऋण (२) थोरवी (३) उतराई (४) भाषा



### चर्चा करूया.

- **जागतिक मराठी राजभाषा दिनाचे तुमच्या शाळेत आयोजन करायचे आहे. त्यासाठी तुम्ही कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन कराल, त्याची यादी तयार करा.**

### खेळूया शब्दांशी.

- **कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.**

(१) आई (२) भिजली (३) थोरवी

## कल्पक होऊया.

- खाली दिलेल्या भेटकार्डावर तुमच्या आवडत्या मित्र/मैत्रिणीच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा संदेश तयार करा.




- खालील तक्त्यात तुमच्या आवडत्या सणांची नावे लिहून त्या निमित्ताने तुमच्या मित्र/मैत्रिणीसाठी शुभेच्छा संदेश तयार करा व लिहा.

| सण | संदेश |
|---|---|
| गुढीपाडवा | स्वागत नववर्षाचे, आशा–आकांक्षांचे, सुखसमृद्धीचे, पडता दारी पाऊल गुढीचे! |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या प्रसंगांच्या निमित्ताने भेटकार्डे तयार करून घ्यावीत. प्रसंगानुरूप शुभेच्छा संदेश तयार करून घ्यावेत.